महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
**OFFICE OF THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT**
DISTRICT PLANNING COMMITTEE
प्रशासकीय ईमारत ९ वा माळा वांद्रे (पुर्व) मुंबई- ४०० ०५१
ADMINISTRATIVE BUILDING, ९ TH FLOOR BANDRA (EAST) MUMBAI ४०० O५१
TEL .NOs. ६५५ ०० ६६. २६५१ ४७ ४२, २ ६५५ ६७ ९९ FAX. २६५५ ६८ ०५

जा.क्र.जिनीस२०३०/का.०३/आस्थाविका/विपस/२०१६-१७/प्रमआक्र-१९४१ दि.१७.०९.२०१६

# आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१६-१७

## प्रशासकीय मंजूरी आदेश

वाचा : १शासन निर्णय क्र.स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२ दि.१२ जुलै.२०१६ (मार्गदर्शक सुचना)

२ महाराष्ट्र शासन नियोजन विभाग निधी वितरण आदेश क्र.स्थाविका -०४१६/प्र.क्र.६९/का.१४८२,दि.२६एप्रिल २०१६.

३ मुख्यधिकारी, मुं.झो.सु.मंडळ, मुंबई-५१ यांचे अंदाजपत्रक क्र.उपमु/मुंझोसुमं/४२२/१६, दि.३०.०७.२०१६

४जिल्हा नियोजन समिती, सोलापुर, यांचे कडील हमीचे पत्र क्र.नियोजन-१९/आस्थाविका/विपस/हमी/संस-२/१६-१७/२७८९, दिं-०८.०७.२०१६, या कार्यालयास प्राप्त दिनांक-०३.०९.२०१६

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये विधान परिषद सदस्य यांना उपलब्ध होणा-या निधीतून मा.आमदार महोदयांनी प्रस्तावित केल्यानुसार व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकानुसार खालील तक्त्यातील कामांना संदर्भिय वाचा-१ मधील मार्गदर्शक सुचनानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**कार्यान्वयीनयंत्रना:-मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, वांद्रे (पुर्व) मुंबई-५१** **(रु.लाखात)**

| अ. क्र. | कामाचे स्थानिक विवरण | कामाचा प्रकार/स्वरुप | आमदाराचे पत्र दि. | तांत्रिक मान्यता क्रमांक | अंदाजपत्र कीय रक्कम | प्रशासकीय मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मातोश्री अहिल्यादेवी वाचनालय, मौजे चेंबूर, छेडा नगर, येथील नं.भूं.क्र.१८५५, जय अंम्बे नगर, चेंबूर, मुंबई-८९ येथे | संरक्षक भिंत बांधकामा करिता | २१.०६.२०१६ | ५६ | १०.०० | १०.०० |
| | एकुण रक्कम रु.दहा लाख मात्र | | | | | १०.०० |

वरील कामांना प्रशासकीय मान्यता ही संदर्भ क्र.१ च्या नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींचे पालन करणे कार्यान्वयीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

**अटी व शर्ती :-**

१. हया कार्यक्रमावरील खर्च पूढील लेखा शिर्षातुन सन २०१६-१७ या वर्षी केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा "नियोजन विभाग, मागणी क्रमांक ओ-१०. ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, १०२-सामुहिक विकास, पंचवार्षीक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (१) बहुउद्देशिय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ( संकेताक ४५१५००१२) (योजनांतर्गत) (दत्तमत) ५३ मोठी बांधकामे "

२. वरील तक्त्यातील स्तंभ क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या रक्कमेइतकाच खर्च करण्यात यावा.

३. या कार्यक्रमांवर होणा-या खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवण्यात यावा. या कार्यक्रमाखाली स्थानिक स्वायत्त संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना देय असलेल्या अनुदानाच्या खर्चासंबधी शासन

5288 26/9/16
26/9/16

OF – EV

Ex. E./EAST/M.S.I.B
U.O. 730
Date. 3/9/16
To, D.E. Sub-Div. III

निर्णय क्र.डीपीसी -१०८४/सीआर-२१, पीआर-२, दि. २६ ऑक्टोबर १९८४ व १७ नोव्हेंबर १९८४ आणि क्र. एसपीडी -१०८९/१५३/सीआर-१५/योजना ६, दि. ३१.०८.१९८९ च्या शासन निर्णयानुसार आदेश पाळण्यात यावेत.

४. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत योजना राबविणा-या अभिकरणांनी मासिक कामानिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे सुध्दा सादर करावीत.

५. प्रशासकीय मंजूरीनंतर कार्यान्वयीन अभिकरणांना त्यांच्या संबंधीत विभागातील सक्षम अधिका-याकडून कामांस तांत्रिक मंजूरी घेणे बंधनकारक आहे.

६. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे नाहरकत प्रमाणपत्र दिले असे समजण्यात येऊ नये. नाहरकत प्रमाणपत्र संबंधीतांकडून प्राप्त करुनच कामे कार्यान्वित करणे ही संबधित कार्यान्वयीन अभिकरणाची सर्वश्री जबाबदारी आहे. जागेचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधीत जागा मालका कडून प्राप्त केल्याशिवाय कामे कार्यान्वित करण्यात येऊ नयेत. तसेच इमारती, बांधकामे ,रस्ते, शौचालये, पोलीस चौकी बांधण्यापूर्वी आवश्यक त्या ठिकाणी शासन निर्णय स्थाविका -२००३-प्र.क.३६९/का-१४४५,दि. २८ नोव्हेंबर २००३ अन्वये सूचनानुसारच फलक लावण्यात यावा. जेणेकरुन स्थानिक लोकांकडून कोणताही न्यायालयीन गूंता निर्माण होणार नाही याची जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यानी घ्यावी

७. कामे पुर्ण झाल्यावर कामांच्या दर्शनी भागावर खालीलप्रमाणे फलक लावण्यात यावा. कामे बांधकाम स्वरुपाची नसतील तेव्हा लाकडी फलक शक्य असल्यास लावावा.

| |
|---|
| आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेले काम- |
| संबधित आमदारांचे नाव व कांमाचे नांव- |
| कामाचे वर्ष- |
| काम सुरू झाल्याचा दिनांक- |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक- |
| कामावर करण्यात आलेला एकूण खर्च- |

८. संरक्षण भिंत , नाला, शौचालय, बगीचा तयार करणे, मोकळया जागेचे क्रिडांगणात रुपांतर करणे. स्मशानभूमीत कामे तसेच व्यासपीठ बांधणे, समाजमंदीर/व्यायामशाळा/वाचनालय इत्यादी स्वरूपात वांस्तूचे बांधकाम करण्यापूर्वी मुंबई महानगरपालिका तसेच संबंधीत जागेची मालकी ज्याच्याकडे अशा सक्षम अधिका-याकडून जागेचे ना-हरकत प्रमाणपत्र संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. कामाचे परिक्षण् व देखभालीचे हमीपत्र खात्री करुनच कामास सुरूवात करावी.

९. या कार्यक्रमात घेण्यात येणा-या कामाचे परिक्षण व देखभालीचे हमीपत्र संबंधीत सक्षम अधिका-याकडून घेणे आवश्यक आहे. सदरचे हमीपत्र असल्याचे खात्री केल्याशिवाय कामास सुरवात करू नये.

१०. काम पुर्ण झाल्यावर मंजूर रक्कमेतील बचत अन्य कोणत्याही कामाकडे परस्पर वळविण्यात येऊ नये अथवा बचतीच्या रक्कमेतून नवीन कामांना प्रशासकीय मंजूरी दिली जाणार नाही.

११. या कार्यक्रमासाठी घेण्यात येणा-या सर्व कामांसाठी वेळोवेळी ठरवून दिलेली सर्व नियम, निकष व पध्दती कार्यान्वयीन अभिकरणांवर बंधणकारक राहतील. तसेच योजने अंतर्गत शासनाचे यापूढे वेळोवेळी होणारे बदल कार्यान्वयीन अभिकरणांवर बंधनकारक राहतील.

१२. या आदेशान्वये मंजूर कामे विहीत वेळेत पूर्ण करण्यात यावीत. विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास ती कामे आपोआप रद्द समजण्यात येतील यासाठी वेगळे आदेश काढण्यात येणार नाहीत.

१३. घोषित किंवा नोटीफाईड न झालेले गलिच्छ वस्तीमध्ये कोणत्याही प्रकारची कामे या कार्यक्रमातून घेण्यात येऊ नये याची दक्षता संबधीत कार्यान्वित यंत्रणानी घ्यावी.

१४. या आदेशानुसार मंजूर करण्यात आलेली जोडपत्रातील कामे इतर कोणत्याही योजनेतून घेण्यात ( उदा. खासदार स्थानिक विकास कार्यक्रम/नगरसेवकनिधी इ.) आलेली नाहीत याची खात्री करूनच कामाला सुरूवात करावी.

(कृ.मा.प.)

१५. अपूर्ण कामांची कामनिहाय माहिती व शिल्लक असलेल्या निधीची सविस्तर माहिती मार्च अखेर (आर्थिक वर्षाच्या शेवटी ) जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कार्यान्वयिन अधिका-यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

१६. मंजूर केलेली बांधकामे जसे बालवाडी, समाजकल्याण केंद्र, वाचनालय, व्यायामशाळा, इत्यादी बांधकामे पूर्ण झाल्यानंतर नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:स्थाविका-२०११/प्र.क्र.१४६/का.१४८२, दिनांक ०२ डिसेंबर, २०११ नुसार जनतेच्या सार्वजनिक वापरात येतील याची दक्षता संबधीत कार्यान्वयीन यंत्रणानी घ्यावी. वास्तू हस्तांतरीत केल्यानंतर संबधीत नोंदणीकृत संस्थेस आवर्ती किंवा अनावर्ती खर्चासाठी योजनेअंतर्गत कसलेही अर्थ सहाय मिळणार नाही.

१७. लेखा तपासणीसाठी आवश्यक असलेली माहिती कार्यान्वयीन अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे.

१८. सदर कामात खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसारच खरेदीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

१९. प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा कामावर झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक/बचत काम पुर्ण झाल्यावर ३० दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावे.

२०. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम सन **२०१६-१७** अंतर्गत कार्यान्वयीन यंत्रणा मु.झों.सुधार मंडळ, यांना १ कामाच्या पूर्ततेसाठी **रु.१०.००/- लाख (अक्षरी रुपये दहा लाख मात्र)** रक्कमेस मंजूरी देण्यात येत आहे.

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

स्वाक्षरीत/-
(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,

१ मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१.मा.आ.श्री अँड रामहरी गोविंदराव रुपनवर-पाटील, (विपस), मु.पो.नातेपुते, ता.माळशिरस, जि-सोलापूर-४१३१०९ यांना माहितीसाठी सादर

२.जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापुर यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३.कार्यकारी अभियंता (पुर्व), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

४.मुख्य लेखाधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

५.लेखाधिकारी / उपलेखापाल, जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर जिल्हा.

६.निवडनस्ती.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

OB